ठाणेवैभव

# वयाच्या ६२ व्या वर्षी वृद्ध महिलेवर बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया यशस्वी

## लिलावती रुग्णालयात पार पडली शस्त्रक्रिया

**कल्याण :** एका 62 वर्षीय महिलेने बॅरिएट्रिक शस्त्रक्रियेद्वारे एका वर्षात तब्बल 35 किलो वजन कमी घटवले आहे. शस्त्रक्रियेपूर्वी या महिलेचे वजन 136 किलो इतके होते. आता या महिलेचं वजन 101 किलो इतके झाले आहे. लिलावती रुग्णालयातील बॅरिएट्रिक सर्जन डॉ. शशांक शहा यांनी ही यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे.

पार्वती वेणुगोपालन या महिलेने वजन कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न करुनही त्यांना यश आले नाही. वजन वाढल्याने त्यांना चालताही येत नव्हते. 2020 मध्ये घरच्या घरी आधाराच्या मदतीने चालण्याचा सराव केला. परंतु घरात चालतानाही तिला अडचणी येत होत्या. दैनंदिन कामे करण्यासाठीही त्यांना कुटुंबियांवर अवलंबून रहावे लागत होते. प्रकृती बिघडत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी लिलावती रुग्णालयातील डॉ शशांक शहा यांच्याशी संपर्क साधला. डॉक्टरांनी त्यांना बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार या शस्त्रक्रियेनंतर या महिलेनं सुमारे 35 किलो वजन कमी केले आहे. या वयात बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया करणं हे खूपच अवघड आहे. कारण वृद्ध लोकांसाठी वजन कमी करणे तरुणांपेक्षा खूप कठीण आहे.



याबाबत बॅरिएट्रिक सर्जन डॉ. शशांक शहा यांनी सांगितले की, महिलेला व्हिलचेअरवर रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले होते. तिला गंभीर स्वरुपाचा स्लीप एपनिया आणि पायाला सूज होती. अतिरिक्त वजनामुळे या महिलेला बसता किंवा उभं राहता येत नव्हतं. स्वतःच्या पायावर ती कुठल्याही आधाराविना चालू शकत नव्हती. अशा स्थितीत वजन कमी करण्यासाठी बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया करणं खूप गरजेचं होतं. पहिल्या 10 दिवसांत तिने 10 किलो वजन कमी केले आहे. आणि त्यानंतर या महिलेनं तब्बल 35 किलो वजन कमी केले आहे. या शस्त्रक्रियेनंतर महिलेचा स्लीप एपनिया नियंत्रणात आला आहे. इतकंच नाहीतर आता ही महिला कुठल्याही आधाराविना स्वतःच्या पायावर चालू लागली आहे.

तर माझ्या वाढलेल्या वजनामुळे मी दैनंदिन कामं करु शकत नव्हते. मी खूप निराश झाले होते. पण बॅरिएट्रिक शस्त्रक्रियेनंतर माझे आयुष्य बदलून गेले आहे. या शस्त्रक्रियेनंतर मी वर्षभरात 35 किलो वजन कमी केले आहे. त्यामुळे आता मी पुन्हा माझ्या पायावर चालू लागले आहे. जगन्नाथ मंदिरात मी चढून जाऊ शकले आहे. जे माझ्यासाठी एक स्वप्नवत होते. मला नवीन आयुष्य दिल्याबद्दल मी डॉक्टरांचे आभार मानते. आता अजून वजन कमी करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे रुग्ण पार्वती वेणुगोपालन यांनी सांगितले.